Impact Factor – 6.625 E-ISSN – 2348-7143

Jan - 2021

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January 2021

Special Issue 258 (B)

## Multidisciplinary Issue




**Chief Editor –**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya Aundh Pune-67

124

# शहीद भगतसिंग यांची विविध क्षेत्रातील कामगिरी

**प्रा.डॉ.राजेंद्र नामदेव रासकर**
इतिहास विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय
औंध ,पुणे -६७
E-mail.rajendraraskar2550@gmail.com
मोबाईल नंबर -९९६०६५९६८४

**प्रस्ताविक**

भगतसिंग हे थोर देशभक्त आणि क्रांतिकारक समाजवादी होते.पण त्याचबरोबर भारतातील सुरुवातीच्या काळातील ते एक मार्क्सवादी विचारवंत आणि विचारसरणी चिंतक होते. अगदी लहानपणापासून त्यांना वाचनाची खूप आवड होती. त्याचप्रमाणे भगतसिंग दिग्गज विचारवंत होते.विचार व विचारसरणीच्या विशेषतः सामाजिक परिवर्तन करण्याचे उद्दिष्ट असणाऱ्या विचारांच्या व विचारसरणीच्या भूमिकेचे त्यांना पूर्ण आकलन झाले होते.भगतसिंग हे थोर राष्ट्रवादी होते त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन बलिदान केले ते एक लेखक होते त्यांनी कारावासात चार पुस्तके लिहिली आहेत. परंतु दुर्दैवाने ही पुस्तके गहाळ झाली आहेत.

वैचारिक राजकीय भाषिक प्रादेशिक अशा सर्व प्रकारच्या भेदांना व सीमांना पार करून समस्त आदिवासींना भगतसिंगाचे विचार व कार्य अनेक वर्षे प्रेरणा देत आहेत.एवढेच नव्हे तर त्यांची निस्सीम त्यागमय जीवन तरुणांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनाच प्रेरणादायी झालेली आहे.भगतसिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या कार्यातून देशभरात जनतेमध्ये जी राजकीय चेतना निर्माण झाली त्यातून महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी चळवळ ही जोमाने पुढे सरकू शकली आणि काँग्रेसमध्ये प्रगतशील प्रवाह बळकट झाला.नंतरच्या काळात भगतसिंग यांचा वारसा पुढे चालवण्याचे काम साम्यवादी चळवळीने पुढे केले.भगतसिंग यांनी सामाजिक ,राजकीय क्षेत्रामध्ये प्रगती घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

**भगतसिंग यांचा जन्म व क्रांतिकारी वारसा:**

भगतसिंग यांचा जन्म 28 सप्टेंबर 1907 रोजी बंगा जिल्ह्यातील लायलपूर या गावी झाला सध्या हे गाव पाकिस्तानमध्ये आहे त्यांच्या वडिलांचे नाव किसन सिंह होते भगतसिंग ची आजोबा अर्जुन सिंग हे आर्य समाजाचे पुरस्कर्ते होते त्यांनी किसन सिंह अजित सिंह सुवर्ण सिंह या तिन्ही मुलांना राजकारणाचे धडे देणे त्यामुळे या तिन्ही मुलांनी स्वातंत्र्यलढ्यात व शेतकऱ्यांना संघटित करण्यात सहभाग घेतलेला होता भगतसिंगाचे अजित सिंग व स्वर्णसिंग हे दोन्ही चुलते सुप्रसिद्ध क्रांतिकारक होते घरामध्ये सर्वत्र क्रांतिकारी वारे वाहत होते त्यांचा स्पर्श भगतसिंग यांना अगदी लहान वयात झाला होता. भगतसिंगांच्या जन्माच्या वेळी त्यांचे वडील व दोन्ही चुलते यांची तुरुंगातून सुटका झालेली होती या सर्व घटनांमुळे घरामध्ये आनंदाचा जल्लोष उडाला होता भाग्य घेऊन जन्माला आलेला मुलगा म्हणजे भाग्यवान मुलांचे नाव भगत असे ठेवण्यात आले होते.१

**बालपण व त्यांची जडणघडण:**

सन 1905 मध्ये बंगालची फाळणी करण्यात आली होती बंगालची फाळणी करण्याचा घातक धोरणाविरुद्ध वंगभंग विरोधी आंदोलन देशात सर्वत्र सुरू झाले होते त्यावेळी भगतसिंग केवळ एक वर्षाचे होते लोकमान्य टिळकांना झालेल्या काळ्यापाण्याच्या शिक्षेविरुद्ध मुंबई गिरणी कामगारांच्या संप झाला त्यावेळी ते दोन वर्षाचे होते पण यामध्ये जेव्हा 'पगडी संभाल ओ जटटा' हे शेतकरी आंदोलन चालवणारे त्यांचे काका

E-ISSN : 2348-7143
January 2021

आदर ठेवुन त्यांचे सतत पुण्यस्मरण करणे हे आपले सर्वांचे कर्तव्य आहे ,परंतु त्यांचे स्मरण करून चालणार नाही तर त्यांचे अपूर्ण कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे.स्वतांत्र्ययोधांच्या त्यागामुळे मिळालेले देशाचे स्वातंत्र्य आपण टिकून ठेवले पाहिजे. भगतसिंगांनी अतिशय लहान वयामध्ये स्वातंत्र्य लढ्यात उढी घेतली. त्यांचे एकंदर आयुष्य २३ वर्ष ,५ महिने आणि २३ दिवस एवढे होते. त्यांचे देश्कार्याचे आयुष्य फार तर १० वर्षाचे आणि खरे तर फक्त ७ वर्षाचे .तरीही ते 'शहीद- ए –आजम' ठरले .ते केवळ त्यांच्या परमोच्च त्यागाने नव्हे तर ज्या मुल्यासाठी ,ज्या विचारासाठी ,ज्या नव्या समाज व्यवस्थेच्या स्वप्नासाठी एक क्रांतिकारक म्हणून ते जगले आणि शहीद झाले.

**संदर्भग्रंथ :**


1. भट विठ्ठलराय, 'क्रांतिकारी भगतसिंग', मनोविकास प्रकाशन,१९८९ पृष्ठ क्र १२.
2. प्रा. चमनलाल, 'शहीद भगतसिंग समग्र वाङ्मय' ,डायमंड प्रकाशन ,पुणे २००७ ,पृष्ठ क्र १.व २
3. महाराज बा.बा. 'भगतसिंग' अस्मिता प्रकाशन, १९८२ पृष्ठ क्र७८
4. उपरोक्त भट विठ्ठलराय पृष्ठ क्र १७.
5. डॉ.राणा भगवानसिंग,' भारत के महान अमर क्रांतिकारक', भारतीय ग्रंथ निकेतन दिल्ली १९८८ पृष्ठ क्र १३व १४.
6. प्रा. चमनलाल 'शहीद भगतसिंग समग्र वाङ्मय' ,डायमंड प्रकाशन ,पुणे २००७ ,पृष्ठ क्र २३५.
7. प्रा. चमनलाल 'शहीद भगतसिंग समग्र वाङ्मय' ,डायमंड प्रकाशन ,पुणे २००७ ,पृष्ठ क्र २०० व २०१.
8. घोष अजय 'भगतसिंह,चंद्रशेखर आझाद,इतर क्रांतिकारक लोक वाङ्मय ,२०१२ पृष्ठ क्र ४५ व ४६
9. भट विठ्ठलराय, 'क्रांतिकारी भगतसिंग', मनोविकास प्रकाशन ,१९८९ पृष्ठ क्र३०.


Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya ★ Aundh,Pune-67 ★

126